आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र -रात्री ८.०५ वाजता

२६ ऑक्टोबर २०२४ - शनिवार

**ठळक बातम्या**

- विधानसभा निवडणुकीसाठी भाजपासह महाविकास आघाडीच्या तिन्ही घटक पक्षांकडून आणखी उमेदवारांची घोषणा

- ग्रामीण भागात सेवा देण्याचं राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचं सर्व डॉक्टरांना आवाहन

- इस्राइलनं केलेल्या हल्ल्यात इराणच्या २ जवानांचा मृत्यू, भारताकडून चिंता व्यक्त

**आणि**

- न्यूझीलंडविरुद्ध कसोटी मालिकेतल्या दुसऱ्या सामन्यासह भारतानं मालिकाही गमावली

**<><><><><>**

विधानसभा निवडणुकीसाठी भाजपानं आज २२ उमेदवारांची दुसरी यादी जाहीर केली. त्यात नाशिक मध्य मतदारसंघातून देवयानी फरांदे, उल्हासनगरमधून कुमार आयलानी, खडकवासला इथून भिमराव तापकीर, पुणे छावणीतून सुनील कांबळे, कसबा पेठेतून हेमंत रासने यांना उमेदवारी मिळाली आहे. जतमधून गोपीचंद पडळकर, सोलापूर शहर मध्य मधून देवेंद्र कोठे, लातूर ग्रामीणमधून रमेश कराड, पंढरपुरातून समाधान आवताडे यांची उमेदवारी जाहीर झाली आहे. आतापर्यंत भाजपाचे १२१ उमेदवार जाहीर झाले आहेत.

राष्ट्रवादी काँग्रेस शरच्चंद्र पवार पक्षानंही आज २२ उमेदवारांची दुसरी यादी आज जाहीर केली. यात माळशिरसमधून उत्तम जानकर, फलटण इथून दीपक चव्हाण, खडकवासला इथून सचिन दोडके, अकोले इथून अमित भांगरे यांना

उमेदवारी देण्यात आली आहे. बीड इथून संदीप क्षीरसागर, गंगापूरमधून सतीश चव्हाण, येवला इथून माणिकराव शिंदे यांना रिंगणात उतरवण्यात आलं आहे.

काँग्रेस आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे या दोन्ही पक्षांनी आपापल्या उमेदवारांची दुसरी यादी जाहीर केली आहे. काँग्रेसनं राळेगाव इथून माजी मंत्री वसंत पुरके, सावनेरमधून अनुजा केदार, अर्जुनी-मोरगाव इथून दिलीप बनसोड, जालन्यातून कैलास गोरंट्याल आणि शीव-कोळीवाडा मतदारसंघातून गणेश यादव यांच्यासह एकूण २३ जणांची उमेदवारी आज जाहीर केली. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षातर्फे आज १८ उमेदवारांची घोषणा झाली. धुळ्यातून अनिल गोटे, हिंगोलीतून रूपाली पाटील, शिवडीतून अजय चौधरी तर भायखळ्यातून मनोज जामसुतकर रिंगणात आहेत. तसंच वर्सोवा इथून हरून खान, घाटकोपर पश्चिम इथून संजय भालेराव आणि विलेपार्ले इथून संदीप नाईक यांच्या नावांची घोषणाही पक्षाने केली आहे.

**<><><><><>**

विधानसभा निवडणुकीसाठी मनसेनं आज पाचवी उमेदवार यादी जाहीर केली. त्यात १५ उमेदवारांचा समावेश आहे.

**<><><><><>**

उद्धव ठाकरे आणि काँग्रेसमध्ये काही जागांची अदलाबदल करण्यासंदर्भात आज चर्चा झाली. काँग्रेसच्या विधीमंडळ पक्षाचे नेते बाळासाहेब थोरात यांनी ही माहिती दिली. १८० पेक्षा अधिक जागा जिंकण्याचं महाविकास आघाडीचं लक्ष्य असल्याचं ते यावेळी म्हणाले. जागावाटपाच्या चर्चा शेवटच्या क्षणापर्यंत चालू

असतात, महाविकास आघाडीचे घटक पक्ष मैत्रिपूर्ण लढती करणार नाहीत, असंही थोरात यांनी स्पष्ट केलं.

<><><><>

मनसे प्रमुख राज ठाकरे यांनी हिंदुत्वाची भूमिका घेतली तसंच भाजपाला मदत केली, त्यामुळे त्यांचे पुत्र अमित ठाकरे यांना माहिम मतदारसंघात निवडणुकीत मदत करायला हवी, असं भाजपचे मुंबई प्रदेशाध्यक्ष आशीष शेलार यांनी म्हटलं आहे.  यासंदर्भात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार यांच्याशी चर्चा करणार असल्याचं त्यांनी सांगितलं.

<><><><>

श्रोते हो, विधानसभा निवडणुकीच्या निमित्तानं ‘आढावा विधानसभा मतदारसंघांचा’ हा कार्यक्रम दररोज संध्याकाळी ७ वाजून १० मिनिटांनी अस्मिता वाहिनीसह प्रादेशिक वृत्त विभागाच्या Youtube वरुन प्रसारित केला जात आहे. या कार्यक्रमात उद्या रायगड या जिल्ह्यातल्या मतदारसंघांचा आढावा आपल्याला ऐकता येईल.

<><><><>

झारखंडच्या पाच सीमावर्ती जिल्ह्यांमध्ये माओवाद्यांविरोधात संयुक्त मोहीम आखणार असल्याचं झारखंडचे पोलिस महासंचालक अजय कुमार सिग यांनी सांगितलं. आगामी विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर ही खबरदारी घेणार असल्याचं त्यांनी म्हटलं आहे. दरम्यान, निवडणूका जाहीर झाल्यापासून सुमारे ५७ कोटी ६७ लाख रुपये किंमतीची अवैध सामग्री आणि रोख रक्कम जप्त केल्याची

माहिती त्यांनी दिली. आदर्श आचारसंहितेचं उल्लंघन केल्याच्या १९ तक्रारी दाखल केल्याचंही त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

सगळ्या डॉक्टरांनी आपल्या व्यावसायिक आयुष्यातली काही वर्ष  ग्रामीण भागात सेवा देण्यासाठी व्यतित करावीत असं आवाहन आज राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी केलं. छत्तीसगडमधल्या नया रायपूर इथं आरोग्य विज्ञान विद्यापीठ आणि आयुषच्या पदवीदान समारंभात त्या बोलत होत्या.  छत्तिसगडसारख्या राज्यात न संपणारा औषधी वनस्पतींचा साठा आहे, त्याची माहिती मिळवण्याबरोबरच संशोधनाला चालना देण्याची गरज असल्याचं त्या म्हणाल्या. तत्पूर्वी राष्ट्रपती भिलईच्या आयआयटी अर्थात भारतीय तंत्रज्ञान संस्थेच्या पदवीदान समारंभात सहभागी झाल्या होत्या.

**<><><><><>**

सक्त वसुली संचालनालयानं कोल्डप्ले आणि दिलजीत दोसान्जी दिलुमिनाती या  संगीत कार्यक्रमांच्या तिकीट विक्रीत झालेल्या गैरव्यवहार प्रकरणी काल दिल्ली, मुंबई, जयपूर, चंदीगढ, बंगळुरु इथं छापे टाकले. त्यात गैरव्यवहारासाठी वापरण्यात आलेले मोबाईल, लॅपटॉप, सिम कार्ड आणि विविध साहित्य जप्त केल. या संगीत कार्यक्रमांच्या तिकीटविक्रीत काळाबाजार करुन ती चढ्या भावानं विकण्यात आली होती.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या, २७ ऑक्टोबर रोजी सकाळी ११ वाजता आकाशवाणीवर ‘मन की बात’ या कार्यक्रमातून देशविदेशातल्या नागरिकांशी संवाद

साधणार आहेत. हा या कार्यक्रमाचा ११५ वा भाग असेल. हा कार्यक्रम आकाशवाणी आणि दूरदर्शनच्या सर्व वाहिन्यांवर, आकाशवाणी वृत्त संकेतस्थळ तसंच न्यूज ऑन एआयआर या ॲपवर प्रसारित केला जाईल.

**<><><><><>**

येत्या १० वर्षात जगाच्या अंतराळ अर्थव्यवस्थेतलं भारताचं योगदान २ टक्क्यांवरुन १० टक्क्यांपर्यंत घेऊन जायचं भारताचं लक्ष्य आहे, असं इस्रोचे अध्यक्ष डॉ. एस. सोमनाथ आज म्हणाले. नवी दिल्लीत आकाशवाणीच्या रंग भवन सभागृहात सरदार पटेल स्मृती व्याख्यानात ते बोलत होते. भारतीय अवकाश धोरण २०२३, सुधारित थेट परकीय गुंतवणुकीची परवानगी यासह अवकाश तंत्रज्ञान क्षेत्रात सरकारनं अनेक नवनवीन उपक्रम हाती घेतले आहेत. सध्या या क्षेत्रात २०० स्टार्टअप कार्यरत असल्याची माहिती त्यांनी दिली.

या क्षेत्रासाठी होणारी आयात कमी करण्यावर भारताचा भर आहे. इस्रोचे उपग्रह विविध क्षेत्रात भारतीयांच्या मदतीसाठी उपलब्ध असल्याचं त्यांनी सांगितलं. प्रसार भारतीचे अध्यक्ष नवनीत सहगल, मुख्य कार्यकारी अधिकारी गौरव द्विवेदी, आकाशवाणीच्या महासंचालक डॉ. प्रज्ञा पालीवाल यांच्यासह इतर मान्यवर यावेळी उपस्थित होते.

**<><><><><>**

संयुक्त राष्ट्रांच्या सुरक्षा परिषदेच्या चर्चासत्रात काश्मिरबाबत चुकीची भूमिका मांडल्यानं भारतानं पाकिस्तानवर कठोर टीका केली आहे. पाकिस्तानचं हे कृत्य चुकीच्या माहितीचा प्रसार करण्याच्या नेहमीच्या सवयीनुसार निंदनीय आणि खोडसाळ असल्याचं भारताचे सुरक्षा परिषदेतले कायम प्रतिनिधी पी हरीश यांनी

म्हटलं आहे. एखाद्या महत्वाच्या वार्षिक चर्चासत्रात असत्य राजकीय भूमिका मांडून सर्वांची दिशाभूल करणं सर्वस्वी चुकीचं असल्याची टीका हरीश यांनी केली आहे.

**<><><><><>**

पाकिस्तानातल्या खैबर पख्तुनख्वा प्रांतात आज झालेल्या आत्मघातकी हल्ल्यात सहा अधिकाऱ्यांसह आठजण ठार झाले. या हल्ल्याची जबाबदारी अजूनही कोणी स्वीकारलेली नाही.

**<><><><><>**

इस्त्रायलनं आज सकाळी इराणवर हवाई हल्ले केले. आजच्या हल्ल्यांमुळे परिसरातला तणाव वाढला आहे. या हल्ल्यात इराणचे दोन जवान मारले गेल्याचं इराणी लष्करानं स्पष्ट केलं आहे. तेहरान, खुजेस्तान आणि इलाम या तीन प्रांतातल्या अंदाजे २० लष्करी तळांवर हे हल्ले करण्यात आले.  मध्य पूर्वेतल्या ओमान, कतार आणि बहारीन या देशांनी इस्त्रायलनं केलेल्या हल्ल्यांचा निषेध केला आहे. याच महिन्याच्या सुरुवातीला इराणनं इस्त्रायलवर हल्ले केले होते.

**<><><><><>**

पश्चिम आशियातल्या तणावपूर्ण परिस्थितीबद्दल भारतानं चिंता व्यक्त केली आहे. तिथं शांतता आणि स्थैर्य प्रस्थापित व्हावं यासाठी संवाद आणि वाटाघाटींचा मार्ग अवलंबला जावा असं परराष्ट्र व्यवहार मंत्रालयानं जारी केलेल्या निवेदनात म्हटलं आहे. सध्याच्या संघर्षामुळे कोणाचाच फायदा होणार नाही तर निरपराध ओलिस आणि नागरिकांनाच त्याचा त्रास होत राहील, असं या निवेदनात म्हटलं आहे.

**<><><><><>**

न्यूझीलंडविरुद्ध तीन क्रिकेट कसोटी सामन्यांच्या मालिकेतल्या सलग दुसऱ्या सामन्यात आज भारताचा पराभव झाला. पहिल्या डावातल्या १०३ धावांच्या महत्वपूर्ण आघाडीसह न्यूझीलंडने विजयासाठी दिलेल्या एकूण ३५९ धावांच्या आव्हानाचा सामना करताना भारतीय संघाचा दुसरा डाव २४५ धावांत आटोपला. आजच्या पराभवासह भारताने ही मालिकाही गमावली आहे. मालिकेतला शेवटचा सामना १ नोव्हेंबर रोजी होणार आहे.

भारतीय संघाच्या दुसऱ्या डावात सलामीवीर यशस्वी जयस्वाल याने केलेल्या ७७ धावा आणि रविंद्र जडेजाच्या ४२ धावांचा अपवाद वगळता इतर फलंदाज फारशी चमक दाखवू शकले नाहीत. न्यूझीलंडच्या मिशेल सतनेर याने दुसऱ्या डावात भारताचे सहा गडी बाद केले. दोन्ही डावात मिळून १३ गडी टिपणारा सतनेर सामनावीर ठरला.

<><><><><>

पाकिस्तानातल्या खैबर पख्तुनख्वा प्रांतात आज झालेल्या आत्मघातकी हल्ल्यात सहा विधी अधिकाऱ्यांसह आठजण ठार झाले. या हल्ल्याची जबाबदारी अजूनही कोणी स्वीकारलेली नाही.

//<><><><><>//